(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# स्त्रियांचे श्रममूल्य आणि श्रमविभागणी

**डॉ. श्रद्धा पाटील** सहायक प्राध्यापक (तासिका तत्त्व)मराठी विभाग, शिवराज कला, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज

---

**प्रस्तावना**

स्त्री-पुरुष जैविक भेदामुळे भारतीय समाजात कामाची विभागणी झाल्याचे पूर्वापार दिसून येते. आजही यात फार लक्षणीय बदल झाला आहे असे म्हणता येणार नाही . भारतीय समाजात कार्यरत असणाऱ्या अनेक संस्थांमुळे पुरुष बलवान , कष्टाची कामे करण्यास कणखर, मजबूत इत्यादी विचारधारेमुळे पुरुष सर्वच बाबतीत श्रेष्ठ व तो करतो ती कामेही श्रेष्ठ ही मूल्ये रुजली. पर्यायाने स्त्री नाजूक , कोमल शिवाय ती करत असणारी कामे दुय्यम हेही आपोआपच रुजत आले . या सगळ्याचा परिणाम म्हणून स्त्री- पुरुषाची जडणघडण दोन वेगवेगळ्या पातळीवर होत आली आहे. अत्यंत महत्त्वाची जबाबदारीची कामे अर्थात घराबाहेरची कामे पुरुषाने करावीत आणि घरातील कामे केवळ स्त्रीने करावीत. ती तिनेच करावीत. तिलाच योग्य रीतीने जमतात. त्यात तिने निपूनच असले पाहिजे इथंपासून ते स्त्री म्हणजे घर सांभाळणारी, मुलं जन्माला घालणारी, उत्तम स्वयंपाकी, सुंदर घरकाम करणारी स्त्री इथंपर्यंत भारतीय स्त्रीचा इतिहास अधोरेखित होतो .भारतीय स्त्री म्हणजे संस्कृतीचे प्रतीक ठरली.मूल्ये जोपासणारी ,विकसित करणारी जबाबदार घटक म्हणून तिच्याकडेच पाहिले जाते. या सगळ्याचा परिणाम म्हणून भारतीय स्त्री पूर्वकाळात अनेक दबाव तंत्रांचा बळी ठरली.जात, धर्म ,राजकारण , संस्कृतीकरण, शिक्षण या सगळ्या बाजूने स्त्री वेठीस धरली जाऊ लागली. पण स्त्रियांचा हजारो वर्षांचा स्त्री म्हणजे अबला हा इतिहास समाजसुधारकांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याने पुसला गेला यात शंका नाही .शारीरिक व मानसिकदृष्ट्या स्त्रिया सक्षम झाल्या .अनेक अंधश्रद्धा परंपरा, रूढी, प्रथा या सगळ्याला विरोध करून स्त्रिया स्वतःचे जगणे आपले, अस्तित्व, तिचा सामाजिक दर्जा ,हक्क ,समानता यावर कार्य करु लागल्या. चळवळीतून स्वतःच्या हक्कासाठी, समान संधीसाठी संघर्षापर्यंत येऊन ठेपल्या . हा संघर्ष स्त्री प्रगतीपासून स्त्रीच्या मानवमुक्तीपर्यंत ठळक होतो ; त्याही एक पाऊल पुढे स्वातंत्र्य, स्वैराचार या अर्थापर्यंत येतो .पण वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात स्त्रीच्या वाट्याला आलेली श्रम विभागणी त्या श्रमाचे मूल्य यावर तटस्थ वृत्तीने विचार होणे गरजेचे आहे . प्रामुख्याने आज देश सांभाळणाऱ्या स्त्री पासून ते अंतराळात प्रवास करणाऱ्या स्त्रीपर्यंत असो की मध्यमवर्गीय स्त्री कोणालाही घर कामातून सुटका करून घेता आलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे महिला सशक्तिकरण या संकल्पनेचा विचार करताना केवळ स्त्रीनेच करावयाची कामे असा शिक्कामोर्तब करण्यात आलेल्या कामांपाठीमागची दुय्यमत्त्वाची भावना आणि त्या भावने मागच्या कारणांचा सखोलपणे विचार होणे गरजेचे वाटते .त्यामुळे महिला सशक्तिकरणाकडे येताना तिच्या श्रमाचा , श्रममुल्यांचा विचार होणेही गरजेचे आहे .

**स्त्री-पुरुष श्रम विभागणीची परंपरा**

जगासमोर भारताची प्रतिमा मानवता व संस्कृती जपणारा देश अशी आहे .भौगोलिक आणि आर्थिकदृष्ट्या भारत संपन्न आहे तसा तो सांस्कृतिक अंगानेही समृद्ध आहे .जगामध्ये सर्वात जास्त आध्यात्मवादी - दैववादी असणारा आपला देश देव, देवता, कर्मकांडे, श्रद्धा, रुढी, परंपरा या सर्व क्रियाव्यापारात अग्रेसर आहे. अनंत काळापासून धर्म आणि समाज याच अंगाने आपल्या देशात सातत्याने परिवर्तने होत आहेत. आजतरी ही प्रतिमा एका वेगळ्या दृष्टिकोनातून जगासमोर येत आहे. या सगळ्याचा परिणाम स्त्री जीवनावरही पडत आला आहे.अध्यात्म आणि दैववादी काळाच्या प्रभावामुळे जैविकदृष्ट्या स्त्रीला दुय्यम समजून श्रमविभागणी करण्यात आली. स्त्रीच्या पवित्रतेचे अधिष्ठान केवळ मूर्ती रुपातील स्त्रीची पूजा, आदर करणे एवढे सीमित दिसते .केवळ प्राचीन भारतात मातृसत्ता कुटुंब पद्धतीमुळे स्त्रीचे स्थान श्रेष्ठ दिसते .काही अंशी आर्थिक व राजकीय अधिकार मातृसत्ताक समाजातील स्त्रियांना होते, तेही स्त्रियांनी शेतीचा आणि घरगुती उपकरणांचा शोध लावल्यामुळे. हळूहळू शेतीचे तंत्र विकसित होत आले, नवीन अवजारांचा शोध लागला तसे घरातील व घराबाहेरील स्त्रीचे स्थान व महत्त्व कमी होत गेले सर्व अधिकार हळूहळू पुरुषाच्या अखत्यारीत आले. मातृसत्ता कुटुंब पद्धती जाऊन पितृसत्ताक कुटुंबा पध्दतीचा जन्म झाला. कुटुंबाच्या प्रमुखपदी पुरुषा आला .पुरुषांच्या हातात सर्वाधिकार आले त्यामुळे तो केंद्रप्रमुख होऊन इतरांना आपल्या नियमाने बंदिस्त करू लागला. त्यामुळे श्रमाची विभागणी शरीररचनेवर आधारित पण स्वामित्व हक्क प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने झाली . उत्पादन व्यवस्थेतील स्त्रीचे श्रम, दर्जा कमी होऊन स्त्रियांचा संपत्तीवरील हक्कही कमी झाला. महत्त्वाच्या कामातून गळती होऊन घरातील कामात सहभाग एवढेच कार्य स्त्रीच्या हाती राहिले. यातूनच मग केवळ मुलांना जन्म देणे, त्यांचे संगोपन करणे, घरातील इतर कामे; जसे की स्वच्छता, साफसफाई, झाडलोट स्वयंपाक करणे, कपडे -भांडी धुणे, सगळ्यांचे आरोग्य सांभाळणे एवढेच काम स्त्रीच्या हाती आले. संपत्ती, नाव, वारसा, अधिकार, हक्क वडिलांकडून पुढच्या पिढीला मिळू लागल्याने स्त्रीचे महत्त्व आणि ती करत असलेली कामे यांना दुय्यम स्थान मिळाले. स्त्री करत असलेल्या कामाला कोणतेही मूल्य नसल्याने तिचा आर्थिक दर्जाही घसरला. या सगळ्यामुळे स्त्रीचे माणूसपण अधोरेखित न होता केवळ उपयोगाची वस्तू म्हणून तिचा वापर होऊ

लागला पुरुषाच्या आधाराशिवाय तिचे जगणे कोणी गृहीत धरेना .त्यामुळे पती हेच सर्वस्व, त्याचे कुटुंब हेच इतिकर्तव्य, कुंटुबातील कामे हीच जबाबदारी ही धारणा रूढ झाली . ती इतकी तीव्र झाली की पती म्हणजे परमेश्वर, तो सांगेल तेच व तीच कामे स्त्रियांनी करणे हा अलिखित नियम ठरला. हे अधिक ठळक करताना आढळल्यास. आ.ह.साळुंखे त्यांच्या " हिंदू संस्कृती आणि स्त्रिया" पुस्तकात म्हणतात त्याप्रमाणे, 'पतिरेको गुरु ; स्त्रीनाम' पती हाच स्त्रियांचा एकमेव गुरु ही संकल्पना रूढ झाली. पर्यायाने या आणि अशाच प्रकारच्या घरकामात स्त्रियांना बांधून ठेवले .

स्त्रियांच्या श्रमाचे अवमूल्यन करणाऱ्या सामाजिक परंपरा

माणसाच्या जीवनामध्ये सामाजिकीकरणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्या जगण्याच्या गरजा, संस्कृती ,पद्धती माणूस सामाजिकीकरणातून शिकत असतो. ज्ञान, श्रद्धा ,कल्पना, निती ,सवयी, मूल्ये, कौशल्ये इत्यादी विषयक दृष्टिकोन सामाजीकीकरण्याच्या प्रक्रियेत घडतात. त्यामुळे समाजातील कुटुंबसंस्था, जातीसंस्था वर्णसंस्था, धर्मांतर्गत परस्पर संबंध, नातेसंबंध इत्यादी मूल घटक अतिशय बारकाईने जपावे - वाढवावे लागतात. या मुलघटकातील स्त्रीच्या श्रमाचा व त्या श्रममुल्यांचा विचार केला तर हे स्पष्ट होते की हे जोपासण्याची जबाबदारी देखील स्त्रीवरच लादली आहे. कुटुंब एकत्र असोत की विभक्त ती बांधून ठेवण्याची कसरत स्त्रीवरच आहे. मानसिक पातळीवर स्त्रीला अनेक प्रकारची घुसमट सहन करत स्वतःचा वेळ व श्रम खर्च करत तिला हे सर्वज्ञकरावे लागते. याचे कोणतेच मूल्य न धरता उलट प्रतिष्ठा व अप्रतिष्ठेच्या कल्पनांमध्ये तिच्या योग्यतेवर शंका घेतली जाते. उदाहरणार्थ, अनेक वर्षापासून चालत आलेले एखादे एकत्र कुटुंब आदर्शवत ठरले तर ते पुरुषाच्या वचकशाहीची प्रतिष्ठा ठरते पण तेच कुटुंब विभक्त झाले तर स्त्रीवर दोष ठेवला जातो. इथे सामाजिक जबाबदारी ओळखताना गल्लत केली जाते. अगदी हीच बाब समाजातील इतर घटकांसाठी लागू केली तर दिसून येते; घर सांभाळून शेती, जनावरे सांभाळणारी, स्त्री असेल तर या वरकड कामाचे आर्थिक मूल्य शून्य असते. उलट तिचा संसार आहे तिनेच नेटाने केला पाहिजे हाच विचार पुढे आणला जातो. विशेष बाब म्हणजे नोकरी करणाऱ्या स्त्रियांना तर रोजच तारेवरची कसरत करावी लागते. महत्त्वाच्या पदांवर काम करताना देखील स्त्रियांना या सामाजिक घटकांची जोपासना तितक्याच ताकतीने करावी लागते. लसूण सोलणे, भाजीचा देठ निवडण्यापासून ते नोकरीतील एखादी महत्त्वाची फाईल जमा करण्यापर्यंत फार तर कामवाली बाई मदतीला येते पण जोडीदार पुरुष किंवा अन्य व्यक्तींकडून तिच्या या वरकड कामाला दुय्यमच दर्जा दिला जातो. स्वतःचा चहा स्वतः करून पिणे यासारख्या शुल्लक कामातही पुरुषी अहंकाराची पुटे चिकटलेली दिसतात पण या अशा अनेक बारीक सारीक कामालाही कमी जास्त प्रमाणात श्रम आणि ऊर्जा खर्च करावी लागते. एक स्त्री दिवसभरात अशा अनेक बारीक सारीक कामांची साखळी उरकत असते ज्याचे कोणतेच मूल्य ती आकारत नाही. अशा वेळी तिला मदत करणे, कौतुक करणे सोडाच पण ही कामं बायकांचीच अशी शिकवण जन्माला आलेल्या मुलीवरदेखील बिंबवण्यास सुरुवात केली जाते. सहाजिकच बिनपगाराची ही कामं स्त्री न कुरकुरता फुकट करते त्यामुळे समाजात यासारख्या कामांना दुय्यम समजले जाते. उलट एखादा पुरुष सहोदरा समजून मदत करत असेल तर 'बायला' म्हणून त्याला हिणवले जाते. त्यामुळे वर्षानुवर्ष ही काम कोणत्याही मोबदल्याशिवाय कितीही त्रास झाला तरी मुकाटपणे स्त्रिया करत आल्या आहेत .जग आज पुढारलेय .काही पुरुष अशी घरकामं करतात.पण त्यांचे प्रमाण नगण्य आहे. तरी भारतात या कामाप्रती म्हणावी तशी प्रतिष्ठा रुजलेली दिसत नाही .आजही खेडेगावात पाणवठ्यावर किंवा नळावर पाणी भरताना एखाद्या बाई ऐवजी पुरुष दिसला तर बायको खुडूक बसली आहे का अशी विचारणा केली जाते तेव्हा पुरुषाने पाणी भरणे किती कमीपणाचे आहे आणि ते बायकांचे काम आहे हे ठळक केले जाते. भारतातल्या अनेक स्त्रियांनी आजवर संस्कृतीचे प्रतीक म्हणून पहाटेच्या दारात रांगोळ्या काढण्यात आपले श्रम खर्ची केले , पण रांगोळी काढण्याचे मूल्य व श्रम याची चौकशी कोणी करत नाही .एखाद्या दिवशी तिने रांगोळी नाही घातली तर घरात सुतक आहे का असे म्हणतात तेव्हा समाजातही स्त्रीने हेच अमुक काम करावे हेच रुजत आले आहे हे स्पष्ट होते .मुलांचे संगोपन असेल किंवा इतर अनेक गोष्टी असतात ज्यात फक्त स्त्रीच्या एकटीचा सहभाग समजून तिच्यावर त्या जबरदस्ती लादण्यात आल्या आहेत .न संकोचता स्त्रिया स्वतःच्या प्रगतीला न रोखता हे सर्व सांभाळत असतील तरी समाजाच्या यशा - अपयशाचे खापर मात्र तिच्यावरच फोडले जाते.

**स्त्रियांच्या श्रमाचे अवमूल्यन करणाऱ्या धार्मिक परंपरा**

समाज सुरळीत चालण्यासाठी धर्माने नियमन होते. हे खरे असले तरी करावयाच्या अनेक धार्मिक कृती एकांगी आहेत असे मला वाटते. आज समाज वैज्ञानिकदृष्ट्या कितीही उच्च दर्जावर पोहोचला असला तरी असे अनेक धार्मिक विधी आहेत ज्यामध्ये स्त्रियांच्या श्रमाला तोटा नसतो. पूजा, व्रतवैकल्ये, नैवेद्य, ओवाळणी, उतारे, होमहवन, गृहशांती अनेक सण-उत्सव, पितृपंधरवडा ,श्राद्ध, सत्यनारायण इत्यादी अनेकविध गोष्टींमध्ये प्रामुख्याने स्त्रीला भूमिका निभावावी लागते. अगदीच साध्या साध्या गोष्टींचा विचार केला तरी दिसून येईल ज्यामध्ये स्त्रियांचे शारीरिक व मानसिक श्रम खर्ची पडतात. अनेक सण उत्सव विधी असे आहेत ज्यामध्ये स्त्रियांनीच उपवास करावयाचे असतात .सणांची तयारी, नैवेद्याची तयारी स्त्रीने करायची पण साजरे मात्र स्त्री पुरुष दोघांनी करायचे. हरतालिकेसारखे व्रत चांगला पती मिळावा म्हणून कुमारीकांनी करावयाचे, भावाचे आयुष्य वाढत राहावे म्हणून नागपंचमीचा उपवास स्त्रीने करायचा, घरातील पुरुष निरोगी राहावेत म्हणून दिवाळीतील पाडव्याचा उपवासही स्त्रीनेच

करायचा या सगळयात तिच्यासाठी काहीच नाही. सगळे इतरांसाठी. म्हणून धार्मिक सण, उत्सव, विधी, व्रत ,वैकले एकांगी वाटतात. होमहवन, नवीन वास्तू बांधली किंवा कोणी निर्वतले तर एखादा गोडाचा पदार्थ किंवा मांस वर्ज करायचे ,तीही जबाबदारी धर्माने स्त्रीवरच ढकललेली आहे. हे सर्व व्यवस्थित झाले तर या धार्मिक यशाचे सामुदायिक वाटप करुन मानकरी होतात पण या सगळयात एखादी घटना प्रसंग वाईट घडले तर मात्र त्याची जबाबदारी एकट्या स्त्रीवर टाकली जाते. त्यामुळे धार्मिकतेच्या नावाखाली अत्यंत सूक्ष्मपणे या सर्व बाबी स्त्रीला एकटीने सांभाळाव्या लागतात. तसे झाले नाही तर अनेक प्रकारची दूषणं समाज देतो. पर्यायाने स्त्रीला, तिच्या कुटुंबाला समाजीकरणाच्या व्यवहारातून वगळण्यात येते. त्यामुळे भीतीपोटी स्त्रिया हे सर्व बिनचूक करतात. कोणत्याही मोबदल्याशिवाय. या सगळ्या प्रक्रियेत शरीराची हानी होते. शिवाय मानसिकताने तो ही बाब वेगळीच.

अशा प्रकारच्या श्रम विभागणीमुळे केवळ कामाला दुय्यम दर्जा मिळाला असे नाही तर ती कामे करणाऱ्या स्त्रियांनाही दुय्यम स्थान देण्यात आले .स्त्रिया करत असलेली घर कामासारखी तत्सम कामे बिनमहत्वाची ठरली. अशी कामे अप्रतिष्ठेची असा चुकीचा भ्रम समाजात रूढ झाला. ही विशिष्ट कामे करण्यासाठी स्त्रिया महत्त्वाच्या ठरल्या. त्यामुळे स्त्रीचे वस्तूकरण होण्यास ही बाब कारणीभूत ठरली. श्रमविभागणीमुळे घरकामाला स्त्रिया उपलब्ध व्हाव्यात या छुप्या हेतूने लग्नाचे वय कमी झाले. स्त्रियांनीच उपासविधी करणे अनिवार्य ठरले. यातून अनेक अघोरी प्रथांचा उदय झाला. स्त्रीजातीचा अनादर वाढला. स्त्री म्हणजे केवळ भोग्यवस्तू समजून तिला वागणूक मिळू लागली. एकूणच गुलाम म्हणजेच स्त्री हे समीकरण रूढ झाले. स्त्रियांना समान श्रम विभागणी जोवर मिळत नाही तोवर अनेक महत्त्वाच्या गोष्टीत उच्च स्थान प्राप्त होणार नाही. संपत्तीचा वारसा, आर्थिक अधिकार जोवर हातात येणार नाहीत तोपर्यंत ती दुय्यमच राहणार हाच विचार समजून घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेच्या आधारे स्त्री-पुरुष दोघांना समान राजकीय व आर्थिक संपत्ती हक्क देण्याचा प्रयत्न केला. हिंदू कोड बिलाद्वारे सामाजिक हक्क देण्याचा प्रयत्न केला. आपल्या भाषणात ते म्हणतात, "जोवर स्त्रियांना संपत्तीचा वारसा मिळत नाही तोवर त्यांची गुलामगिरी संपणार नाही." त्यामुळे श्रमविभागणीचे संकेत सर्वप्रथम मोडून काढले पाहिजेत.

**श्रमविभागणी, श्रममूल्य आणि सशक्तीकरण**

स्त्री सशक्तीकरण प्रामुख्याने दोन घटकांवर अवलंबून आहे. पहिल्यांदा स्त्री मनातील स्त्रीची चुकीची प्रतिमा स्त्रीने बदलवणे आणि दुसरी म्हणजे समाजमनातील स्त्रीची चुकीची प्रतिमा समाजाने बदलवणे. कारण, महिला सशक्तिकरण म्हणजे केवळ स्त्रीचा सर्वांगीण विकास, दर्जा ,हक्क, अधिकार प्राप्ती असा नाही तर तसे पोषक वातावरण आजूबाजूलाही तिला मिळणे अत्यावश्यक आहेत. सशक्तीकरणात स्त्रीची अस्मिता जोपासणे, माणूस म्हणून पूर्ण स्वातंत्र्य, समानतेच्या अधिकारात संधी या सगळ्याचा समावेश होतो. एक परिपूर्ण माणूस म्हणून तिचे व्यक्तिमत्व सर्व बाजूंनी आकाराला येणे ही कृती सशक्तिकरणात अपेक्षित आहे. पण तसे होत नाही. स्त्री म्हणून येणाऱ्या अनेक जबाबदाऱ्यांनी अनेक स्त्रिया आज मागास आहेत. याचा अर्थ तीने त्या नाकाराव्यात असा त्याचा अर्थ नाही पण स्त्री-पुरुष दोघांना या कामांचे समान वाटप केले पाहिजे. ते तसे होत नाही त्यामुळे स्त्रियांना अधिकचे मानसिक व शारीरिक कष्ट सहन करावे लागतात. या अंगाने विचार करणारे लेखन 'नीलम गोऱ्हे 'यांनी "समाज आणि महिला" या पुस्तकात केले आहे त्या लिहीतात, "भारतीय घटनेने महिलांना बहाल केलेला समानतेचा हक्क महिलांच्या विकासाचा पाया आहे. सहाव्या पंचवार्षिक योजनेपासून महिलांच्या विकासाची प्रक्रिया वेगवान झाली असली तरी समान विकास साधताना महिलांसमोर येणाऱ्या अडचणींची संख्याही वाढली आहे. या वैयक्तिक पातळीवर येणाऱ्या अडचणी कशा सोडवायच्या हा अनेक महिलांसमोरचा प्रश्न आहे." त्यामुळे स्त्री करत असलेल्या कामांचे मूल्य वाढलेच पाहिजे. केवळ स्त्री नव्हे तर पुरुषालाही स्वतःचे अस्तित्व टिकवायचे असेल तर दोहोंच्या स्वतःच्या मूलभूत गरजांच्या अंगाने आधी विचार करायला हवा. जगण्यासाठी करावी लागणारी तुरळक कामे जसे की, खाणे, पिणे, स्वच्छता, स्वयंपाक, बालसंगोपन इत्यादी नित्यकर्मे पुरुषांनाही वाटून दिली पाहिजेत. ही सर्व घरकामे स्त्रीने करुन मग तिने दैनंदिन कार्यापलीकडे जाऊन काहीतरी भव्य दिव्य करावे ही अपेक्षा पहिल्यांदा थांबवावी लागेल. स्त्रीलाच घर कामासाठी गृहीत धरणे बंद करावे लागेल. कोणताही पुरुष स्वतःहूनही ही कामे करणार नाही .त्यामुळे मुलीवर जसे लहानपणापासून या कामांचे संस्कार केले जातात तसे ते मुलांवरही केले पाहिजेत .प्रापंचिक जबाबदाऱ्या पार पाडूनच ज्याने त्याने आपले अस्तित्व सिद्ध केले. पाहिजे यातूनच स्त्रीचे आर्थिक परावलंबन कमी होईल. सोबत पुरुषाचे घरकामातील अज्ञान कमी होऊन त्यालाही हळूहळू या कामांची सवय लागेल. तेव्हा मग या कामांचे महत्त्व वाढून ही कामे प्रतिष्ठित ठरतील तसे झाल्या वरच श्रममूल्य एका समान पातळीवर प्रस्थापित होईल .

**समारोप**

महिला सशक्तीकरणात स्त्रियांची श्रमविभागणी आणि श्रममूल्ये या घटकांचा प्रामुख्याने विचार व्हायलाच हवा. कारण तिला दुय्यमत्व देण्यात जबाबदार असण्यामध्ये प्रामुख्याने श्रमविभागणी आणि श्रमाचे अवमूल्यन ही गोष्ट महत्त्वाची ठरते. जोवर कामाची विभागणी व्यवस्थित होणार नाही तोवर स्त्रीला तिच्या विकासास वाढ करण्यास पोषक वेळ मिळणार नाही. त्यामुळे घरकाम आणि घराबाहेरील दोन्ही कामे स्त्री पुरुष दोघांनाही समान वाटून घेऊन करावी लागतील. तसे झाले तरच दोघांचा पूरक विकास होऊन दोघेही समान पातळीवर यशस्वी होतील.